महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई. मेल :- cgmte@mahadiscom.in
फॅक्स नं. :- ०२२ -२६५८०६४२
वेबसाईट :- www.mahadiscom.in

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष
म.रा.वि.वि.कं.मर्यादित
प्रकाशगड, ४ था मजला,
स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

क्र. साप्रवि/मु.म.व्य. (तां.आ.)/मपुक/ ३३६५५ दिनांकः १४/११/२०११

प्रति,

सर्व मुख्य अभियंते (सांघिक कार्यालय वगळून),

म.रा.वि.वि.कं.मर्या.

विषय : कारागिर "क" (फ्युजमन-नि-मिटर वाचक) व तत्सम यांना यंत्रचालकाच्या सेवाजेष्ठतेमध्ये सामावून घेणे व त्याच्या पदोन्नती बाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र. साप्रवि/मु.म.व्य (तां.आ.)/मपुक/४४५४ दि.१०/०२/२०१०
२) परिपत्रक क्र. साप्रवि/मु.म.व्य (तां.आ.)/मपुक/७६२ दि.०८/०३/२०११
३) परिपत्रक क्र. साप्रवि/मु.म.व्य (तां.आ.)/मपुक/३०२४२ दि.०४/१०/२०११

मनुष्यबळ पुनर्विलोकनामध्ये सहाय्यक केबल योजी, मिटर निरीक्षक श्रेणी-१, मिटर चाचणीक श्रेणी -१, मिटर निरीक्षक श्रेणी -२, मिटर चाचणीक श्रेणी -२, मिटर चाचणीक श्रेणी -३ ही पदे सुध्दा अतिरीक्त म्हणुन घोषीत झालेली असुन सद्यस्थितीत या संवर्गातील कर्मचारी ते सेवानिवृत होईपर्यत कंपनीच्या सेवेत राहणार असुन त्यांचे वेतन त्यावेळेपर्यत इतर रिक्त पदासमोर काढावे लागणार आहे. उपरोक्त सर्व पदे वेतन गट - ३ मधील असुन त्या सर्व पदांची शैक्षणिक अर्हता समान आहे. त्यामुळे ही सर्व पदे समकक्ष आहेत.

उपरोल्लिखित पदांना पदोन्नती नसल्यामुळे सेवानिवृतीसाठी दोन वर्षे राहिलेल्या कर्मचा-यांना तसेच त्यांना पदोन्नती नको असल्यास त्यांनी तशा आशयाचे संमती पत्र संबधित मुख्य अभियंता यांना सादर करुन अशा कर्मचा-यांना यंत्रचालक संवर्गामध्ये समाविष्ट करु नये व त्यांना समकक्ष पदाप्रमाणे काम देण्यात यावे. जे कर्मचारी समाविष्ट करण्यात येतील त्यांना त्याबाबत १५ दिवसांचे नेमुन दिलेल्या कामाबाबत आणि संपुर्ण सुरक्षा विषयक बाबींचे प्रशिक्षण द्यावे. सदर कर्मचारी उपकेंद्रामध्ये काम करण्यास प्रशिक्षित झाल्याची खात्री करुन तदनंतर त्यांची पदस्थापना तत्सम पदावर करण्यात यावी.

सदर पत्रक कंपनीच्या इन्ट्रानेटवर उपलब्ध असून याची हार्ड प्रत कोणत्याही कार्यालयास पाठविली जाणार नाही.

राहुल गोवर्धन

**कार्यकारी संचालक (मा.सं.)**